# विवेकानंद कॉलेजच्या विक्रांत सुर्वेला विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धेत रौप्यपदक



**कोल्हापूर** : वारणानगर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेजचे विक्रांत राजेंद्र सुर्वे (बी.एस्सी. भाग २) याला रौप्यपदक प्राप्त झाले. याबद्दल शिवाजी विद्यापीठाच्यावतीने गौरवचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या यशाबद्दल विक्रांत सुर्वे यांचा श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कॉलेजचे रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

विक्रांत सुर्वे याला जिमखाना विभाग प्रमुख हवलदार, प्रा. एस. आर. सरनार, प्रा. मोहिद कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समिर पठाण, सुरेश चापले यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले.